# अमर हिंद मंडळ, दादर

## (स्थापना : २६ जानेवारी १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९)



फक्त सभासदांसाठी

अमर हिंद मंडळ दादर, मुंबई - २८


# ६२ वा वार्षिक अहवाल २००८-०९


अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई-४०० ०२८.

दूरध्वनी : २४२२ ३५ ८९, २४२१ ९० ११

# भारतीय स्वातंत्र्याचा ६२ वा वर्धापनदिन सोहळा

**शनिवार, दि. १५ ऑगस्ट २००९ सकाळी ८.३० वाजता**



**अमर हिंद मंडळाचे कार्याध्यक्ष,** डॉ. धनंजय कीर फौंडेशनच्या सावित्रीबाई फुले रात्र कन्या शाळेचे उपाध्यक्ष, सानेगुरुजी रुग्ण सहाय्य ट्रस्टचे विश्वस्त **मा. श्री. चिंतामणी विश्वनाथ नागले** यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे तद्नंतर कै. मधुकर ज. फडके यांच्या स्मरणार्थ होणाऱ्या कला-क्रीडा खेळाडूंचा गुणगौरव समारंभ त्यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे.

श्री. चिंतामणी नागले हे गेली अनेक वर्षे दादर विभागातील सेवाभावी संस्थामध्ये कार्यरत आहेत. शिस्तबद्ध कार्य आणि सदैव कार्यतत्पर राहणारे श्री. नागले आजही वयाच्या चौऱ्याऐंशीव्या वर्षी अत्यंत जिद्दीने कार्य करीत आहेत.

सकाळी ८.३० वाजता सुरु होणाऱ्या ह्या कार्यक्रमाला आपण अगत्याने उपस्थित रहावे ही विनंती.

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९

### ★ विश्वस्त ★

| | |
|---|---|
| श्री. दिनकर पाटील | ॲड. श्री. मुकुंद तिवरेकर |
| श्रीमती उषा मेहता | |

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | श्री. वसंत भालेकर |
| **उपाध्यक्ष** | : | श्री. रमेश वरळीकर |
| | | मेजर श्री. विजय अडसुळे (१० ऑगस्ट ०८ पर्यंत) |
| | | श्री. भास्कर सावंत (१० ऑगस्ट ०८ पासून) |

### ★ कार्यकारी समिती ★

| | | |
|---|---|---|
| **कार्याध्यक्ष** | : | श्री. चिंतामणी नागले |
| **कार्योपाध्यक्ष** | : | श्री. दीपक पडते |
| **कार्यवाह** | : | श्री. अरूण देशपांडे |
| **संयुक्त कार्यवाह** | : | श्री. सतीश रेडीज |
| **कोषाध्यक्ष** | : | श्री. श्रीकृष्ण राणे |
| **सदस्य :** | | श्री. संजय पेडणेकर |
| | | श्री. विजय राणे |
| | | डॉ. स्नेहल बिर्जे (१० ऑगस्ट २००८ पर्यंत) |
| | | श्री. चारुदत्त थरवळ (१० ऑगस्ट २००८ पर्यंत) |
| | | श्री. भास्कर केरकर (१० ऑगस्ट २००८ पर्यंत) |
| | | श्री. दत्ता सावंत (१० ऑगस्ट २००८ पासून) |
| | | श्री. प्रफुल्ल पाटील (१० ऑगस्ट २००८ पासून) |
| | | श्रीमती निलिमा पालकर (१० ऑगस्ट ०८ पासून) |
| | | श्रीमती सीमा कोल्हटकर (१० ऑगस्ट ०८ पासून |
| **सदस्य (स्वीकृत)** | : | श्री. दत्ता सावंत, श्री. प्रफुल्ल पाटील (१० ऑगस्ट २००८ पर्यंत) |
| | | श्री. दिपक नाडकर्णी, श्री. विलास कारेकर (१० ऑगस्ट २००८ पासून) |

# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई - ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि.१५/०८/२००९ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. वसंत भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :-

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन् २००८ - २००९ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन् २००८ - २००९ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.

४. सन् २००९-२०१० साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५. सन् २००९-२०१० चे अंदाजपत्रक मंजूर करणे. (परिशिष्ट ब)

६. निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.

७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

दि. २५/०७/२००९

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

अरुण अ. देशपांडे

कार्यवाह

## सूचना :

१. गणपूर्तीचे अभावी नियोजितवेळी सभा सुरु न झाल्यास सभा स्थगीत करण्यात येईल, ही स्थगीत सभा त्याच ठिकाणी १०.३० वाजता भरेल व ही सभा पूर्णपणे वैध असेल.

२. सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक, संस्थेच्या कामकाजासंबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी ते मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरूपात बुधवार, दि.१२ ऑगस्ट २००९ पर्यंत सायं. ६ ते ८ या वेळेत (रविवार व्यतिरिक्त) सादर करावेत.

३. सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत तसेच हयात नसलेल्या सभासदाच्या संबंधितांनी तत्सबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

४. सर्वसाधारण सभेसाठी येताना कृपया हा अहवाल सोबत घेऊन यावा.

५. सभासद ओळखपत्रासाठी पाठविलेले फॉर्म संपूर्णपणे भरुन कार्यालयात जमा करावे.

# वार्षिक अहवाल
## (दिनांक १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९)

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,

सादर वन्दे,

मंडळाचा वार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणाला सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

दि. २६ जानेवारी २००९ रोजी मंडळाच्या स्थापनेला ६२ वर्षे पूर्ण झाली. अहवाल काळात मंडळाने अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडाविषयक उपक्रम, कार्यक्रम आयोजित केले.

मंडळाच्या क्रीडा विभागाने अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला, तसेच मंडळाचे दिवंगत कार्यवाह **उमेश शेणॉय** यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय खोखो स्पर्धेचे शिवाजी पार्क येथे आयोजन करुन अमर हिंद मंडळाच्या कार्यसम्राट सेनानीला हार्दिक आदरांजली वाहिली.

मंडळाच्या कलाविभागाने अनेक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याबरोबरच मंडळाचेही अनेक कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केले. कलाविभागाने कार्यकारी मंडळासाठी आयोजित केलेले **विचार मंथन शिबीर**, खेळाडू कलाकार, कार्यकर्ते यांच्यासाठीचे **व्यक्तिमत्व विकास शिबीर, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व-स्पर्धा** या सर्व उपक्रमांमुळे मंडळाला सुयोग्यपणे कार्य करण्याची नवी दिशा मिळाली. त्याच बरोबर रंगकर्मींसाठीची **सांस्कृतिक अमावस्या** तसेच एकांकिका स्पर्धांमध्ये मानाचे स्थान मिळविलेली **कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा** यामुळे ही मंडळाने आपल्या कार्याचा ठसा ठळक केला.

मंडळ आपल्या परंपरेला साजेसे कार्य करीत आहे. अहवालकाळात मंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी समितीची निवडणूक जाहीर करण्यात आली होती. परंतु अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी समितीची बिनविरोध निवड झाली. अहवाल काळात मंडळाची घटना दुरुस्ती करण्यात आली. हे नमूद करताना आनंद होत आहे.

## मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे

**सभा :** अहवाल कालावधीत कार्यकारी समितीच्या ११ सभा झाल्या तर कार्यकारी समिती आणि विश्वस्त यांच्या ०३ संयुक्त सभा झाल्या (कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट अ पहा)

**मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा :-** मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १० ऑगस्ट २००८ रोजी संपन्न झाली या सभेस एकूण ४३ तहहयात सभासद उपस्थित होते.

**तहहयात सभासद :** अहवाल काळात नवीन तहहयात सभासद करुन घेण्यात आले नाहीत. मंडळाचे एकूण तहहयात सभासद ४५५ असून पैकी ७० सभासदांशी मंडळाचा कोणत्याही प्रकारचा संपर्क होत नाही.

**विगतवारी निधी :** अहवाल काळात क्रीडा निधीत १०,००,०००/– कलानिधीत ३,००,०००/–, वसंतव्याख्यानमाला निधीत २,००,०००/– वैद्यकीय मदत निधीत ५,००,०००/–, समाज कल्याण निधीत ५,००,०००/– एकूण २५,००,०००/– (रुपये पंचवीस लाख फक्त) वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था :** १ जानेवारी २००९ ते ३१ डिसेंबर २००९ या कालावधीसाठी **'मयुर कॅटरर्स'** यांना संपूर्ण केटरिंग, डेकोरेशन व्यवस्थेसाठी ठेकेदारी देण्यात आली.

**उपक्रम आणि कार्यक्रम :** ६१ वी वसंत व्याख्यानमाला मंडळाची ६१ वी वसंतव्याख्यानमाला रविवार, दि. २० एप्रिल २००८ रोजी पुणे विद्यापिठाचे कुलगुरु मा. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या **'शिक्षणाच्या नव्या दिशा'** या विषयावरील उद्घाटनपर व्याख्यानाने सुरु झाली. व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि. २७ एप्रिल २००८ रोजी श्रीमती कविता महाजन यांच्या **'माझे लेखन प्रवासातील अनुभव'** या विषयावरील व्याख्यानाने झाला.

| अ. क्र | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १. | २० एप्रिल २००८ | व | वक्ते – डॉ. नरेंद्र जाधव<br>विषय : शिक्षणाच्या नव्या दिशा |
| | २१ एप्रिल २००८ | सं | वक्ते – डॉ. अरुणा ढेरे<br>विषय : कर्वे, आगरकर आणि महाराष्ट्र |
| | २२ एप्रिल २००८ | त<br>व्या | कबड्डी – कबड्डी परिसंवाद<br>विषय : मराठी रंगभूमीवर आघाडीवर असलेल्या १६ पुरस्कार प्राप्त, सुयोग निर्मित कबड्डी – कबड्डी ह्या नाट्यप्रयोगावर परिसंवाद, सहभाग – अभिनेते श्री. विनय आपटे, अभिनेत्री श्रीमती मुक्ता बर्वे, लेखक – श्री. जितेंद्र पाटील, दिग्दर्शक – श्री. मंगेश कदम व निर्माते सुधीर भट |
| | २३ एप्रिल २००८ | ख्या | वक्ते – पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने<br>विषय : डोळ्यांची निगा व नेत्रदानाचे महत्व |
| | २४ एप्रिल २००८ | न | वक्ते – श्री. गिरीश वासुदेव<br>विषय : भारताची आर्थिक स्थिती, स्वातंत्र्य मिळाले तेव्हाची आणि आजची |
| | २५ एप्रिल २००८ | मा | वक्ते – श्री. मोहन आपटे<br>विषय : चंद्रलोक |
| | २६ एप्रिल २००८ | | वक्ते – श्री. धनराज वंजारी<br>विषय : दहशतवाद एक सामाजिक आव्हान |
| | २७ एप्रिल २००८ | ला | श्रीमती कविता महाजन<br>विषय : माझे लेखन प्रवासातील अनुभव<br>व्याख्यानानंतर व्याख्यानमालेची सांगता झाली. |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| २. | ५ एप्रिल २००८ | सांस्कृतिक अमावस्या दोन एकांकिका | आत्मविभोर आत्ममग्न – सादर कर्ते अमर हिंद मंडळ कलाविभाग<br>निमिषमात्र – प्रवेश कलाक्रीडा मंच |
| ३. | ५ मे २००८ | सांस्कृतिक अमावस्या दोन एकांकिका | भिकमंगे – सादर कर्ते अमर हिंद मंडळ कलाविभाग<br>छापाकाटा – मृदगंध थिएटर्स |
| ४. | ८ ते ११ मे ०८ | कै. उमेश शेणॉय स्मृतिचषक राज्यस्तरीय खोखो स्पर्धा | उद्घाटन – खासदार श्री. मनोहर जोशी, सौ. विणा परब गोरे – अर्जुन पुरस्कार विजेती, पारितोषिक वितरण – श्री. विलास गावकर –प्रसिद्ध उद्योजक, श्री. अशोक पानवलकर वरिष्ठ सहा. संपादक महा. टाईम्स |
| ५. | ८ जून २००८ | सांस्कृतिक अमावस्या दोन एकांकिका | गुरुर्ब्रह्मा – सादर कर्ते एकलव्य थिएटर<br>आदर्शांच्या जाचातून – अमर हिंद मंडळ कलाविभाग |
| ६. | ३ जुलै २००८ | सांस्कृतिक अमावस्या एकांकिका | तू आणि मी – संकल्प थिएटर |
| ७. | १२,१३ जुलै ०८ | विचारमंथन शिबीर | सहभाग – ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकारी समिती |
| ८. | १ ऑगस्ट ०८ | सांस्कृतिक अमावस्या काव्यवाचन | मीठी मिठी सर्वांसाठी<br>सादरकर्ते – श्री. सुर्यकांत जाधव |
| ९. | १५ ऑगस्ट ०९ | स्वातंत्र्यदिन ध्वजारोहण माजी अध्यक्ष कै. म. ज. फडके स्मृती प्रित्यर्थ गुणवंत खेळाडूंचा गुणगौरव | प्रमुख पाहुणे – श्री. रमाकांत आचरेकर, सुप्रसिद्ध क्रीडा प्रशिक्षक |
| १०. | १७ ऑगस्ट ०९ | मंगळागौर बँक ऑफ इंडियाच्या सहयोगाने | सादरकर्ते – झपूर्झा मंडळ, विलेपार्ले |
| ११. | ३०,३१ ऑगस्ट २००८ | व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा<br>संवाद कौशल्य<br>नेतृत्व कौशल्य<br>संघटन कौशल्य | मार्गदर्शक – डॉ. अजय ताम्हाणे,<br>सहभाग – ३२ कलाकार, खेळाडू, कार्यकर्ते, तहहयात सभासद |
| १२. | ३१ ऑगस्ट ०८ | सांस्कृतिक अमावस्या लोकसेवा आयोग परीक्षा मार्गदर्शन | मार्गदर्शक – प्रा. संजय मोरे<br>सहभाग – कलाकार, खेळाडू, कार्यकर्ते, तहहयात सभासदांची मुले |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १३. | ९ सप्टेंबर २००८ | जागर गणेशाचा पथनाट्य | सादरकर्ते इको फ्रेंडली पथनाट्य संस्था, प्रायोजक – महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ |
| १४. | २८,२९ सप्टेंबर २००८ | कै. आबा पडते राज्य स्तरीय एकांकिका स्पर्धा प्राथमिक फेरी | परीक्षक – श्री. पंकज चेंबुरकर, श्रीमती वैभवी पवार, श्रीमती आशालता महाजन, श्री. रमाकांत चव्हाण, सहभागी संस्था – ३८ |
| १५. | १० ऑक्टोबर २००८ | कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा अंतिम फेरी शिवाजी मंदिर, दादर | परीक्षक – श्रीमती आशा शेलार, श्री. संतोष पवार, श्री. प्रकाश बुद्धीसागर प्रमुख पाहुणे – श्रीमती लीना भागवत, अंतिम फेरीतील सहभागी संस्था – ६ |
| १६. | २४ ऑक्टोबर २००८ | सांस्कृतिक अमावस्या दोन अंकी नाटक | एप्रिल फुल बनाया<br>लेखक – श्री. योगेश सोमण, दिग्द. – श्री. सुभाष सराफ सादरकर्ते – आरती आर्ट ॲकॅडमी |
| १७. | १३,१४ डिसेंबर २००८ | विचारमंथन शिबीर | सहभाग – ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकारी समिती |
| १८. | २ जानेवारी २००९ | आठवणींचा सुवर्णमहोत्सव लिट्ल थिएटर बालरंगभूमी या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा | प्र. पाहुणे – श्री. रत्नाकर मतकरी, श्री. यशवंत देव बालनाट्य गीते ध्वनीमुद्रिका, विनोदायन दुसरी आवृत्ती यांचे प्रकाशन<br>**स्फुटनाट्य – ढुम ढुम ढुमाक** |
| १९. | ४ जानेवारी २००९ | गाणे प्रकाशाचे ब्रेन लिपीचे जनक ब्रेल यांच्या द्वी जन्मशताब्दी निमित्त संगीत, नृत्यमय कार्यक्रम | सहभाग – नॅब, व्हिक्टोरिया मेमोरियल, कमला मेहता अंध विद्यालय, संयोजन : श्रीमती उत्तरा मोने अमर हिंद मंडळ आणि मिती क्रिएशन यांच्या सहयोगाने |
| २०. | १८ जानेवारी २००९ | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा | परीक्षक – श्री. प्रेमानंद गज्वी, श्रीमती रंजनी म्हैसाळकर, श्री. शुभानन गांगल<br>सहभाग ४२ विद्यार्थी |
| २१. | २५ जानेवारी २००९ | सांस्कृतिक अमावस्या दोन एकांकिका | सौभद्र एके सौभद्र सादरकर्ते – स्मार्ट थिएटर<br>ढीगारा – अमर हिंद मंडळ कलाविभाग |
| २२. | २६ जानेवारी २००९ | प्रजासत्ताकदिन अमर हिंद मंडळाचा ६२ वा वर्धापन दिन | ध्वजारोहण श्री. शांती पटेल,<br>सांस्कृतिक कार्यक्रम पाऊल खुणा,<br>संकल्पना लेखक दिग्दर्शक श्री. संतोष परब |
| २३. | ९ फेब्रुवारी २००९ | निमंत्रित जिल्हास्तरीय पुरुष खोखो स्पर्धा | प्रमुख पाहुणे – श्री. प्रकाश शेट्ये, प्रसिद्ध उदयोजक पारितोषिक वितरण – श्री. वि. वि. करमरकर, ज्येष्ठ क्रीडा समिक्षक |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| २४. | २५ फेब्रुवारी २००९ | सांस्कृतिक अमावस्या दोन एकांकिका | मी कोण? सादरकर्ते – संवेदना परिवार वाचनीय अमर हिंद मंडळ कलाविभाग |
| २५. | २ मार्च २००९ | महिला दिना निमित्त निर्सर्गोपचार आरोग्य शिबीर | सहभाग – २०० महिला मार्गदर्शक डॉ. कुमूद जोशी, संयोजक श्रीमती उत्तरा मोने, अमर हिंद मंडळ व तनिष्क संवाद मंच यांच्या सहयोगाने |
| २६. | १६ ते २३ मार्च २००९ | प्राणायाम आणि योग शिबीर | मार्गदर्शक – श्री. श्रीकांत बर्वे, श्रीमती मेधा चिपकर, श्री. सुरेश यादव, श्री. नंदकुमार भातखंडे, श्री. संदीप वंजारे, संयोजन–श्री. दिपक नाडकर्णी कार्यकारी समिती सदस्य |
| २७. | २६मार्च २००९ | सांस्कृतिक अमावस्या दोन एकांकिका | तुझं ते माझं सादरकर्ते अमर हिंद मंडळ कलाविभाग तो पर्यंत वाट पहा – आयोरा क्रिएशन |

## अभिनंदनीय :– कबड्डी – महिला

अखिल भारतीय आणि राज्यस्तरीय स्पर्धेतील कामगिरी

- ❖ **मावळी मंडळ, ठाणे राज्यस्तरीय स्पर्धा – अजिंक्यपद**
  उत्कृष्ट खेळाडू – दिप्ती पारकर
- ❖ **अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा, अकोला उपांत्य पराभूत**
- ❖ **एच.जी.एस. क्रीडा मंडळ, राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा उप. उपांत्य पराभूत**
- ❖ जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेतील कामगिरी
- ❖ **अजिंक्यतारा मित्र मंडळ, गिरगांव उपांत्य पराभूत**
- ❖ **सूर्य प्रतिष्ठान, लोअर परेल उपांत्य पराभूत**
- ❖ **शिवनेरी सेवा मंडळ, शिंदेवाडी, दादर (पूर्व), उपांत्य पराभूत**
- ❖ **राष्ट्रवादी युवक काँग्रेस, प्रभादेवी उपात्य पराभूत**
- ❖ **ओम ज्ञानदीप मंडळ, द्वितीय क्रमांक**
- ❖ देना बँक कबड्डी स्पर्धा उपांत्य पराभूत, उत्कृष्ट खेळाडू – रुतुजा देऊळकर
- ❖ कु. दिप्ती पारकर, मुंबई शहर कबड्डी संघाचे प्रतिनिधित्व (महिला)
  मुंबई विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व
- ❖ कु. भक्ती इंदुलकर (ज्यू गट) मुंबई शहर कबड्डी संघाचे – मुंबई विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व
- ❖ कु. रुतुजा देऊळकर – (कुमारी गट) मुंबई शहर कबड्डी संघाचे प्रतिनिधीत्व, ज्यू. महाराष्ट्र निवड
- ❖ कु. तेजस्विनी पोटे – मुंबई शहर कबड्डी संघाचे प्रतिनिधीत्व (किशोरी गट)

**कबड्डी – पुरुष**

- ❖ मुंबई जिल्हा अजिंक्यपद (किशोर) उपविजयी कु. अभिषेक पाटील, मुंबई संघात निवड
- ❖ मुंबई जिल्हा अजिंक्यपद (कुमार गट) उपांत्य उपविजयी सुनिल मोकल (मुंबई संघाचे कर्णधारपद)

❖ एच. जी. एस. क्रीडा मंडळ लोअर परेल (राज्यस्तरीय स्पर्धा) उपांत्य उपविजयी

❖ साधना क्रीडा मंडळ कुरुंदवाड येथील राज्यस्तरीय स्पर्धेत कुणाल यादव यास दिवसाचा मानकरीचे पारितोषिक

❖ **मंडळाचे व्यावसायिक संघात खेळणारे खेळाडू पुढील प्रमाणे :-**

**पश्चिम रेल्वे संघ :- कुणाल यादव, हेमंत रडके , साईनाथ काळसेकर, रवींद्र रडके**
**देना बँक :- प्रितम लाड, युनियन बँक :- सिद्धार्थ गायकवाड,**
**बँक ऑफ इंडिया :- विजय नागवेकर, सुनिल मोकल**

## खोखो :-

१) **मुंबई जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा** :- ५ ते ९ नोव्हेंबर २००८ शिवाजी पार्क येथे झालेल्या (किशोर/किशोरी) १४ वर्षाखालील खोखो स्पर्धेत **किशोर संघ विजयी झाला. तर किशोरी संघाला उपविजयी** पदावर समाधान मानावे लागले.

प्रसाद राडीये - सरंक्षक, कुणाल बापर्डेकर - आक्रमक, श्रद्धा नमसले - आक्रमक

किशोर व किशोरी संघातर्फे मुंबई संघात खालील खेळाडूंची निवड झाली.

**प्रसाद राडीये (उपकर्णधार), कुणाल बापर्डेकर, केदार शिवलकर, आदेश कागडा, श्रद्धा नमसले (उपकर्णधार) आक्रमक, त्रिवेणी चव्हाण, भक्ती राडीये, तन्वी उपळकर (राखीव)**

२) **मुंबई जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा (मुली)** :- १८ ते २१ नोव्हेंबर २००८ विजय क्लब येथे झालेल्या या स्पर्धेत **श्रद्धा नमसले** (मुली) मुंबई संघात निवड.

३) **मुंबई जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा (महिला)** :- १८ ते २१ नोव्हेंबर २००८ विजय क्लब येथे झालेल्या या स्पर्धेत महिला संघाला **तिसरा क्रमांक** मिळाला.

**श्रद्धा नमसले** (महिला) मुंबई संघात निवड.

**श्रद्धा नमसले** - मुंबई संघात तिन्ही गटात निवड झालेली मंडळाची पहिली खेळाडू.

मुंबईत विद्यार्थी क्रीडा केंद्रातर्फे प्रथमच खेळवण्यात आलेल्या मॅटवरील प्रायोगिक स्पर्धेत (४ फूट ११ इंच किशोर गट जोड जिल्हा) मंडळाला उपविजयी पदावर समाधान मानावे लागले. कालावधी (२२ ते २६ जानेवारी २००९)

**बी. ओ. आर सी. सी. खोखो स्पोर्ट्स क्लब** आयोजित किशोर व किशोरी खोखो स्पर्धा कालावधीत ५ ते ७ फेब्रुवारी २००९ ह्या स्पर्धेत **किशोर संघाला उपविजयी** पदावर समाधान मानावे लागले :- **अभिषेक कागडा** सरंक्षक खेळाडू म्हणून गौरविण्यात आले.

**प्रसाद राडीये** - किशोर गट अष्टपैलू खेळाडू म्हणून सोन्याची अंगठी व सायकल देऊन गुणगौरव.
**केदार शिवलकर** - किशोर गट आक्रमक खेळाडू म्हणून गुणगौरव.
**श्रद्धा नमसले** - किशोरी गट आक्रमक खेळाडू म्हणून गुणगौरव.

## इतर विशेष :-

गोरेगांव येथील पुरुष निमंत्रित खोखो स्पर्धेत मुंबई संघात निवड - **अमित चिखलकर**

अश्वमेघ स्पर्धेत मुंबई विद्यापीठात निवड - **अमित चिखलकर, निकेश धुरी**

आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत मुंबई विद्यापिठात निवड - **निकेश धुरी**

## कलाविभाग :-

कल्पना एक अविष्कार अनेक, ओमसाई, महाराष्ट्र ऐक्यवर्धक एकांकिका स्पर्धा

कु. शंतनु रांगणेकर, श्री. विजय कदम — अभिनय पारितोषिक

श्री. अंबर हडप — लेखन पारितोषिक

## विशेष अभिनंदन :-

- मंडळाच्या विश्वस्त **श्रीमती उषा मेहता** यांना दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठान तर्फे शांता शेळके सरस्वती सन्मान पुरस्कार मिळाला – काव्य कारकिर्द
  आपटे वाचन मंदिर- इंचलकरंजी – पुरस्कार मिळाला – निरंतर काव्य संग्रह
- मंडळाचे उपाध्यक्ष **श्री. भास्करराव सावंत** यांना यु. आर एफ फॉडेशनचा पुरस्कार मिळाला – क्रीडा कार्यकर्ता
- उपाध्यक्ष **श्री. रमेश वरळीकर** यांनी खोखो संदर्भातील वृत्तपत्रीय लेखनाचे ३०० लेख पूर्ण केले.
- कार्यकारी समिती सदस्य – **श्री. प्रफुल्ल पाटील** – मुंबई पुरुष व महिला निवड चाचणी सदस्य म्हणून निवड.

मंडळाचे तहहयात सभासद, कार्यकारी सदस्य क्रीडा कार्यकर्ते **श्री. भास्करराव केरकर** यांनी दि. १५/७/२००८ रोजी वयाची ८० वर्षे पूर्ण केली त्या निमित्त मंडळात झालेल्या सत्कार समारंभात क्रीडा क्षेत्रातील विविध कार्यकर्ते हजर होते.

## इतर संकीर्ण :-

- अहवाल काळात सभागृह, मैदान यांची निगा राखण्यासाठी आवश्यक कामे करुन घेण्यात आली.
- अहवाल काळात कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्यात आली.
- प्रतिवर्षाप्रमाणे स्वांतत्र्यदिनी माजी अध्यक्ष **कै. मधुकर ज. फडके** यांच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.
- प्रतिवर्षाप्रमाणे तहहयात सभासद, आजी माजी खेळाडू हितचिंतक यांना दिवाळीची भेटकार्डे मंडळाच्यावतीने पाठविण्यात आली.
- खेळाडूंना, कर्मचाऱ्यांना गणवेश देण्यात आले.
- राज्यपातळीवर तसेच राष्ट्रीय पातळीवर जिल्हाचे तसेच राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळाच्या खेळाडूंना अनुक्रमे ५००/- व १०००/- रुपये अनुदान देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.
- इंडियन असोसिएशन फॉर दि हॅण्डीकॅप या संस्थेला १०००/- रुपये देणगी देण्यात आली.

खालील संस्थांना व्यक्तींना विनामूल्य/सवलतीच्या दरात सभागृह देण्यात आले.

१) कंझ्युमर गाईडन्स सोसायटी
२) ॲड पी. व्ही. सूरते यांच्या श्रद्धांजली सभेसाठी
३) यादव गवळी समाज स्नेहमेळावा
४) सी. डी. देशमुख आर्थिक विचारमंच परिसंवाद
५) चिंतामणी स्पोर्ट्स क्लब स्थापना समारंभ
६) मुंबई खोखो संघटना कार्यकारी समिती सभा
७) सी. के. पी. एज्युकेशन सोसायटी – गुणी विद्यार्थ्यांचा गुणगौरव
८) श्री. भास्करराव केरकर – वयाची ८० वर्षे पूर्ण केल्याचा सत्कार समारंभ

## समारोप :-

मंडळाचे क्रीडाविभाग प्रमुख श्री. दीपक पडते क्रीडाविभागाची जबाबदारी समर्थपणे पेलीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विजय राणे कबड्डीचे तर श्री. प्रफुल्ल पाटील, श्री. संजय पेडणेकर खोखो तसेच श्री. निकेश धुरी, श्री. निलेश सावंत, श्री. अमित संत, श्री. जतिन टाकळे हे व अन्य खोखोचे प्रशिक्षक म्हणून दैनंदिन सराव घेत आहेत.

कलाविभागाची जबाबदारी कलाविभाग प्रमुख श्री. दत्ता सावंत यांनी योग्य प्रकारे सांभाळली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक नवीन कलाकार, कार्यकर्ते तयार होत आहेत.

मंडळाच्या लिपीक श्रीमती स्नेहा तेंडुलकर, कर्मचारी श्री. संदीप चांदे, श्री. दिनेश मालप यांचे दैनंदिन कामकाजात तसेच वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रम उपक्रमांत योग्य सहकार्य मिळत आहे.

मयुर कॅटरर्सचे श्री. अविनाश पाटील, श्री. मयुर पाटील यांचे वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांत व उपक्रमांत मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.

अहवाल काळात जाहीर झालेल्या निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष कार्यकारी समिती सदस्य यांना बिनविरोध निवडून देऊन मंडळाच्या सभासदांनी विश्वस्त मंडळ, अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल सर्व तहहयात सभासदांचे या अहवालाच्या निमित्ताने विनम्रपणे आभार व्यक्त करीत आहोत. मंडळाची कार्यकारिणी मंडळाच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्ध आहे हे पुन्हा एकदा नमूद करीत आहोत. मागील सर्वसाधारण सभेत जाहीर केल्याप्रमाणे सभासदांसाठी काही विशेष कार्यक्रम योजना आम्ही आखण्यास प्रारंभ केला आहे. तहहयात सभासदांना ओळखपत्रे देण्यासाठी तसेच त्यांची माहिती अदयावत करण्यासाठी कार्यवाही सुरु झालेली आहे. तहहयात सभासदांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी शिवाजी मंदिर येथे आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्यात **गोची प्रेमाची** या व्यावसायिक रंगभूमीवर धुमधडाक्यात सुरु असलेल्या नाटकाच्या प्रयोगाला सभासदांनी दिलेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.

शिवाजी मंदिर येथे आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्याला सभासदांनी दिलेल्या प्रतिसादामुळे आमचा उत्साह वाढला आहे. सभासद, खेळाडू, कलाकार यांच्यासाठी एक दिवसाची सहल आयोजित करण्याचा मानस व्यक्त करीत आहोत.

मंडळाने समाज कल्याण निधीतून मनोरंजनाद्वारे बालमनांना सुसंस्कारीत करणारा बालनाट्य २००९ हा उपक्रम सुरु केला असून त्या अंतर्गत मंडळाने माजी कलाविभाग प्रमुख कै. विनोद हडप यांचे **अप्पू अस्वल्या करी गुदगुल्या** हे बालनाट्य रंगभूमीवर आणले आहे. या बालनाट्याने २० एप्रिल ते ५ जुलै या दरम्यान २५ प्रयोग झाले. गरीब, अपंग, निराधार मुलांना हे बालनाट्य विनामूल्य दाखविण्यात आले. तर सामान्य मुलांसाठी सवलत दरात दाखविण्यात आले. या उपक्रमाद्वारे मंडळाने आणखी एक समाजसेवी उपक्रम सुरु केला आहे.

वसंत व्याख्यानमाला, बालनाट्य शिबीर, बालनाट्य, प्रथमच जिल्हास्तरीय मॅटवरील कबड्डी स्पर्धा या कार्यक्रमांद्वारे आगामी वर्षातील भरघोस कार्यक्रमांची नांदी सुरु झालेली आहे. पुढील वर्षभरात अनेक उपक्रम, कार्यक्रम होणार आहेत. सर्व तहहयात सभासदांनी या कार्यक्रमांचा उपक्रमांचा लाभ घ्यावा.

अमर हिंद मंडळाचा कार्यभार सांभाळण्यासाठी तसेच कार्यक्रमांचे प्रमाण वाढलेले असतानाही ते नियोजितपणे आयोजित करण्यासाठी सर्व पदाधिकारी, कार्यकारी समिती सदस्य, खेळाडू, कलाकार, कार्यकर्ते वेळोवेळी सहकार्य करीत असतात. त्यांच्या सहकार्याचा मी विनम्रपणे उल्लेख करीत आहे.

अहवाल कालावधीत आयोजिलेल्या कार्यक्रमांत, उपक्रमांत सहभागी होऊन सभासदांनी दिलेले सहकार्य तसेच मंडळाचे कर्मचारी, कार्यकर्ते, हितचिंतक, कलाकार, खेळाडू यांनी दिलेले सहकार्य याचा तसेच सुप्रसिद्ध उदयोजक **श्री. विलास गावकर** यांनी भरघोस देणगी देऊन केलेल्या सहकार्याचा कृतज्ञता पूर्वक उल्लेख करून आणि पुढील वाटचालीत या सर्वांचे सहकार्य मिळेल अशी सदिच्छा व्यक्त करून हा अहवाल समाप्त करीत आहे.

कळावे लोभ असावा आणि तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

अरूण अ. देशपांडे

कार्यवाह

## श्रद्धांजली

अहवाल काळात निधन पावलेल्या मंडळाच्या ज्ञातअज्ञात सभासद, हिंतचिंतक, कार्यकर्ते यांना अमर हिंद मंडळाची भावपूर्ण श्रद्धांजली.

# (परिशिष्ट 'अ')


## कार्यकारी समितीच्या १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ सभा उपस्थितीची माहिती

### एकूण सभा १२

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. चिंतामणी वि. नागले | (कार्याध्यक्ष) | ११ | |
| २) श्री. दीपक ना. पडते | (कार्योपाध्यक्ष) | ०९ | |
| ३) श्री. अरूण अ. देशपांडे | (कार्यवाह) | ११ | |
| ४) श्री. सतीश श. रेडीज | (सहकार्यवाह) | १० | |
| ५) श्री. श्रीकृष्ण शं. राणे | (कोषाध्यक्ष) | १० | |
| ६) श्री. भास्कर भिवा केरकर | (सदस्य) | ०० | १०.८.०८ पर्यंत |
| ७) श्री. चारूदत्त शां. थरवल | (सदस्य) | ०० | १०.८.०८ पर्यंत |
| ८) श्री. विजय प्र. राणे | (सदस्य) | ११ | |
| ९) श्री. संजय वि. पेडणेकर | (सदस्य) | ०८ | |
| १०) डॉ. स्नेहल मा. बिर्जे | (सदस्य) | ०० | १०.८.०८ पर्यंत |
| ११) श्री. प्रफुल्ल दा. पाटील | (सदस्य) | १० | |
| १२) श्री. दत्ता अ. सावंत | (सदस्य) | ०९ | |
| १३) श्रीमती निलीमा पालकर | (सदस्य) | ०३ | १०.८.०८ पासून |
| १४) श्रीमती सीमा कोल्हटकर | (सदस्य) | ०३ | १०.८.०८ पासून |
| १५) श्री. दिपक नाडकर्णी | (सदस्य स्वीकृत) | ०४ | ७.१०.०८ पासून |
| १६) श्री. विलास कारेकर | (सदस्य स्वीकृत) | ०३ | ७.१०.०८ पासून |




उमेश शेणॉय स्मृती चषक खोखो स्पर्धेतील ज्येष्ठ खेळाडू सौ. शुभांगी (कोंडुरकर) जाधव हिचे स्पर्धेतील उत्तम नैपुण्याबद्दल कौतुक करताना उद्योजक विलास गावकर सोबत अशोक पानवलकर



कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक देताना प्रमुख पाहुण्या लीना भागवत, कार्यवाह अरूण देशपांडे, कोषाध्यक्ष श्रीकृष्ण राणे



स्वातंत्र्यदिन सोहळा : डॉ. शांती पटेल यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष चिंतामणी नागले, विश्वस्त दिनकरराव पाटील, कार्यवाह अरूण देशपांडे




६१ वी वसंत व्याख्यानमाला वक्ते डॉ. तात्याराव लहाने यांचा सत्कार करतांना मंडळाचे कार्याध्यक्ष चिंतामणी नागले